महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर

# राष्ट्रीय सेवा योजना

# विशेष श्रमसंस्कार शिबिर

## नवेखेड, ता.वाळवा, जि. सांगली

दिनांक ३ जानेवारी २०२४ ते ९ जानेवारी २०२४

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज उरुण-इस्लामपूर

## राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रमसंस्कार शिबिर

## नवेखेड ता.वाळवा, जि.सांगली

**दि. ३ जानेवारी २०२४ ते ९ जानेवारी २०२४**

## अहवाल

- **दिनांक- ३ जानेवारी २०२४**

1. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे (NSS) 'विशेष श्रमसंस्कार शिबिर' मौजे नवेखेड येथे आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग जनरल कौन्सिलचे सदस्य माननीय अँड.सतीश पाटील यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज,उरुण-इस्लामपूरचे उपप्राचार्य मा. प्रा.(डॉ.) नितीन शिंदे हे होते
2. तसेच या कार्यक्रमाला नवेखेडगावचे लोकनियुक्त पहिल्या महिला सरपंच माननीय सौ. अश्विनी संताजी गावडे, उपसरपंच रवींद्र बाबुराव चव्हाण, मा. वसंत जाधव चेअरमन, सहकारी सर्व सेवा सोसायटी नवेखेड, ग्रामपंचायत सदस्य व गावातील मान्यवर उपस्थित होते.

- **दिनांक ४ जानेवारी २०२४**

1. शिबिराच्या दुसऱ्या दिवशी सकाळी ८:०० ते १२:३० या कालावधी मध्ये विद्यार्थ्यांनी **कृष्णा नदी घाट, स्मशानभूमी परिसर** व त्यापुढील रस्त्यांची स्वच्छता व साफसफाई केली.
2. दुपारी ३:०० ते ५:३० या वेळेत कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्रा. श्री शंकर एस. चव्हाण यांचे **'छत्रपती संभाजी महाराज समज गैरसमज'** या विषयावर व्याख्यान झाले
3. संध्याकाळी ६:०० ते ८:०० या वेळेत 'चमत्कारातून समाज प्रबोधन' या विषयावर मा. नानासाहेब पिसे यांचे व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष नवेखेड गावचे प्रथम लोकनियुक्त माजी सरपंच मा.प्रदीप चव्हाण उपस्थित होते.
4. या शिबिरामध्ये मुलींनी राबवलेले उपक्रम १) आयुष्यमान कार्ड याचे सर्वे करणे. यामध्ये नवेखेड येथील एकूण १५७ घरांमध्ये सर्वे केला असता ४५१ जणांनी आयुष्यमान कार्ड काढले

असल्याचे आढळून आले. २) डेंग्यू आजार होऊ नये म्हणून घरोघरी जाऊन समुपदेशन केले. ३) गृहिणी महिलांचे फ्रिजमध्ये साठलेले पाणी कसे बाहेर काढावे याविषयी जागृती केली. ४)दूषित पाण्यामुळे होणाऱ्या विविध रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी घरावरील भिंतीवरती भितीपत्रके लावण्यात आली.

- **५ जानेवारी २०२४**

१) ५ जानेवारी, २०२४ रोजी रयत शिक्षण संस्थेच्या नागनाथ (अण्णा) नायकवडी विद्यालय जुने-नवेखेड परिसरातील स्वच्छता करून झाडांना आळी करण्यात आली, व त्यांना पाणी घालण्यात आले.

२) प्राथमिक जिल्हा परिषद शाळा नवेखेड येथील बगीचासाठी लागणारे सुशोभीकरण करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांनी दोन डंपर माती मैदानामध्ये पसरून मैदानाचे सपाटीकरण केले.

३) मुलींनी विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसर तसेच ग्रामपंचायत नवेखेड परिसर स्वच्छ केला.

४) दुपारी ३ ते ५ या वेळेत मा. अंकुश चव्हाण यांचे 'वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आजचा युवक' या विषयावर उद्बोधन पर व्याख्यान झाले.

५) सायंकाळच्या सत्रामध्ये मा. उदयसिंह पाटील यांचे कथाकथन झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.डी.बी.पाटील हे होते.

- **६ जानेवारी २०२४**

१) 'पर्यावरण संरक्षण... विश्व रक्षण' या ब्रीदवाक्याला अनुसरून 'वसुंधरा संरक्षण..... पर्यावरण रक्षण' या विषयावर संपूर्ण गावातून **जनजागृती रॅलीचे** आयोजन करण्यात आले होते.

२) राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांची 'राष्ट्रीय एकात्मता व सद्भावनाचे' प्रतीक असणाऱ्या **मानवी साखळीचे** आयोजन करण्यात आले होते यामध्ये गावातील सरपंच, उपसरपंच व सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

३) **नवेखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र** परिसराची स्वच्छता करण्यात आली.

४) **जिल्हा** परिषद प्राथमिक शाळा नवेखेड येथील मॉडेल स्कूल अंतर्गत येणाऱ्या शाळेतील एका रूमला (कंप्यूटर लॅब) रंगकाम करून त्या लॅबचे सेटअप करून देण्यात आले.

५) नवेखेड येथील पिण्याचे पाणी टाकीचा परिसर स्वच्छ केला.

६) चांदोली वसाहत मधील रस्त्यांची तसेच जिल्हा परिषद शाळेच्या परिसराची स्वच्छता केली. या ठिकाणी सुमारे शंभर फूट इतक्या लांबीच्या पाईपसाठी **चर** काढून देण्यात आली.

७) 'सार काही... तिच्यासाठी' या उपक्रमांतर्गत आठरा वर्षावरील मुलींच्या 'मासिक पाळी सर्वेक्षण' फॉर्म भरून साठ (६०) मुलींची माहिती घेण्यात आली.

८) दुपारच्या सत्रामध्ये बळीराजा संघटनेचे अध्यक्ष मा. बी.जे. पाटील (काका) यांचे 'सामाजिक चळवळीतील युवकांचे योगदान' या विषयावर व्याख्यान झाले.

९) संध्याकाळच्या सत्रामध्ये समुपदेशक व संमोहनतज्ञ मा. कैलाश सुतार यांचा हिप्नॉटिझमचा कार्यक्रम स्वयंसेवक व ग्रामस्थांसाठी सादर करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.रविंद्र बाबुराव चव्हाण हे होते. या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते त्यांच्यावर संमोहन करून त्यांच्याकडून विविध स्वरूपाची प्रात्यक्षिके करून घेण्यात आली या कार्यक्रमास ग्रामस्थांचा प्रचंड प्रतिसाद लाभला.

- **७ जानेवारी २०२४**

१) नवेखेड गावातील रस्त्यांची साफ-सफाई, स्वच्छता करण्यात आली.

२) 'नातं रक्ताच परिवार' आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर पार पडले यामध्ये एकूण २० रक्तदात्यांनी रक्तदान केले.

३) दुपारच्या सत्रात 'चला स्वतःशीच बोलूया' या विषयावर श्री. अक्षय माने यांचे विविध उपक्रमातून विविध प्रात्यक्षिके करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

४) सायंकाळच्या सत्रामध्ये ज्येष्ठ शैक्षणिक विचारवंत कॉम्रेड धनाजी गुरव यांचे 'आजची शिक्षण व्यवस्था' या विषयावर व्याख्यान झाले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मा. नेताजी गणपतराव चव्हाण हे उपस्थित होते.

- **८ जानेवारी २०२४**

१) गावातील प्रमुख रस्ते स्वच्छ करून झाडांना अळी करून त्यांना गावातील सन्माननीय आजी-माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आदि मान्यवर यांच्या हस्ते पाणी घालण्यात आले.

२) प्राथमिक आरोग्यकेंद्र, नवेखेड येथे 'आरोग्य शिबिरांतर्गत स्वयंसेवक मुलींची हिमोग्लोबिनची तपासणी करण्यात आली.

३) चांदोली वसाहत मधील कुटुंबाचे आयुष्यमान भारत कार्ड सर्व्हे करण्यात आला.

४) सायंकाळच्या सत्रामध्ये 'सांस्कृतिक कार्यक्रमाचे' आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शिबारार्थींनी नृत्य, गायन, एकपात्री नाटक, मिमिक्री आदि विविध कला प्रकारामध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कर्मचारी मा. जगन्नाथ नांगरे (बापू) यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

- **९ जानेवारी २०२४**

१) राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांची राहण्याची व्यवस्था असलेल्या जिल्हा परिषद शाळा परिसराची स्वच्छता करण्यात आली.

२) विशेष श्रमसंस्कार शिबिर समारोप कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून वाळवा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मा. आबासाहेब पवार व अध्यक्ष म्हणून महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. अँड. एन. आर. पाटील (काका) उपस्थित होते. प्रमुख उपस्थिती मध्ये महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य मा. बी. ए. पाटील (बापू), अँड.मा. सतीश पाटील तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. नितीन शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य मा. मिलिंद खंडेलोटे, नवेखेडच्या सरपंच सौ.अश्विनी गावडे, उपसरपंच रविंद्र चव्हाण, नवेखेड सर्व सेवा सोसायटीचे व्हा.चेअरमन मा.रविंद्र नाथा थोरात, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक / ग्रामविस्तार अधिकारी मा.शाहरुख महाबली, तसेच प्रशाकीय सेवक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




शिबिर उद्घाटन समारंभ प्रमुख पाहुणे मा. अँड सतीश पाटील




उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष उपप्राचार्य मा. प्रा.(डॉ) नितिन शिंदे




कृष्णा नदी घाट परिसरातील स्वच्छ करताना




नदी घाट परिसर स्वच्छ करताना




नागनाथ अण्णा नायकवडी विद्यालय परिसर स्वच्छता करताना




स्मशानभूमी परिसर स्वच्छता करताना




चांदोली वासाहात शाळा पिण्याच्या पाण्याची पाईप चर खुदाई करताना





झाडांना आळी करताना



गटार स्वच्छता करताना स्वयंसेवक




आभा कार्ड सर्वेक्षण करताना स्वयंसेवक




दूषित पाण्यापासून होणाऱ्या रोगाविषयी जाणीव जागृती करताना



आरोग्य जाणीव जागृती उपक्रमांतर्गत होमोग्लोबीन तपासणी करताना




राष्ट्रीय एकात्मता व सद्भावना दर्शवणारी मानवी साखळी




पर्यावरण संरक्षण विषयक जाणीव जागृती फेरी




रक्तदान करताना स्वयंसेवक




'चमत्कारातून समाज प्रबोधन' या विषयावर मार्गदर्शन करताना मा. नानासो पिसे




'सामाजिक चळवळीत युवकांचे योगदान' या विषयावर संवाद साधताना मा. बी.जी. काका




कथाकथन करताना मा. उदयसिंह पाटील




'आजची शिक्षण व्यवस्था' या विषयावर मार्गदर्शन करताना मा.कॉ.धनाजी गुरव




हिप्नोटीझम करताना मा. कैलाश सुतार




मासिक पाळी विषयक जागृती करताना स्वयंसेवक




‘छत्रपति संभाजी महाराज  समज गैरसमज’  या विषयी व्याख्यान देताना प्रा. शंकर चव्हाण




सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी स्वयंसेवक



सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद घेताना ग्रामस्थ




शिबिर समारोप प्रसंगी मनोगत करताना एन.एस एस प्रतिनिधी कु. प्रसाद पाटील




शिबिर समारोप प्रसंगी बोलताना प्रमुख पाहुणे मा.आबासाहेब पवार
(गटविकास अधिकारी वाळवा पंचायत समिती )




शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. अँड एन.आर.पाटील.(काका) (अध्यक्ष महात्मा फुले शिक्षण संस्था, इस्लामपूर )